ॲन्टी करप्शन ब्युरो, कॅम्प साक्री
दिनांक :- ०९/०५/२०२२.

**ब पत्रक**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पोलीस स्टेशन | :- | चोपडा शहर पोलीस स्टेशन |
| २. | जिल्हा | :- | जळगाव |
| ३. | गु.र.नं. व कलम | :- | भाग-६ गु.र.नं. ७४५/२०२२, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| ४. | सापळा अधिकारी | :- | श्री.मंजितसिंग चव्हाण, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे. |
| ५. | अन्वेषण अधिकारी | | एन. एन. जाधव, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव |
| ६. | फिर्यादीचे नाव | :- | लिलाधर धनसिंग कोळी, वय ३५, व्यवसाय:- खाजगी ठेकेदारी, रा. खर्डी ता. चोपडा जि. जळगाव |
| ७. | आरोपीचे नाव | :- | भगवान पाडुरंग यहीदे वय ५८, ग्रामविकास अधिकारी, ग्राम पंचायत, वर्डी, ता. चोपडा जि. जळगाव रा. प्लॉट नं ६५, बोरवले नगर-२, चोपडा जि. जळगाव |
| ८ | अप.घ.ता.वेळ | :- | दि.०९/०५/२०२२ रोजी 15:38 वाजता |
| ९ | अप.घ.ठिकाण | :- | चोपडा येथील चोपडा-शिरपुर रस्त्यालगतच्या हॉटेल जयेश येथे |
| १० | अप.दा.ता.वेळ | :- | दि.09/०५/२०२२ रोजी 22:03 वाजता |
| ११ | मागणी केलेली लाचेची रक्कम | :- | ११,०००/- रुपये (तडजोडीअंती) |
| १२ | लाच स्विकारली रक्कम | :- | ११,०००/- रुपये |

१३ तपशिल :- वरील ता.वेळी व ठिकाणी यातील तक्रारदार हे खर्डी ता. चोपडा जि. जळगाव येथील रहिवाशी असुन ते खाजगी बांधकाम ठेकेदारीचा व्यवसाय करतात. ग्राम पंचायत वर्डी ता. चोपडा येथील पंधराव्या वित्त आयोगा अंतर्गत निधीतुन गटार व ढापे बांधकामाचे काम जळगाव येथील जितेंद्र विठठल पाटील रा. जळगाव हया शासकीय ठेकेदाराने दि. ३१.१२.२०२१ च्या ई निविदा प्रकीयेव्दारे घेतले असुन सदरचे काम तक्रारदार यांनी त्यांचेकडुन सदरच्या कामाचा सब ठेका शंभर रुपयाच्या स्टॅम्प पेपर वर दि.११.०२.२०२२ रोजी सब कॉन्ट्रॅक्टर करारनामा करुन घेतले होते. करारनामा प्रमाणे तक्रारदार यांनी सब ठेका घेतलेले काम पुर्ण केले असुन झालेल्या कामाचे बिल शासकीय ठेकेदाराच्या नावे अदा होणेकरीता तक्रारदार यांनी ग्रामविकास अधिकारी श्री. भगवान यहिदे यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांचेकडे ५ टक्याप्रमाणे १२,५००/-रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो धुळे कार्यालयाकडे तक्रार दिली होती.

तक्रारीच्या अनुषंगाने दि.०९/०५/२०२२ रोजी पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान वरील आलोसे यांनी तडजोडीअंती ११,०००/- रु. लाचेची मागणी केली होती. त्या अनुषंगाने सापळा कारवाई केली असता आलोसे यांनी पंचासमक्ष ११,०००/-रूपये लाच स्वत:च्या आर्थिक फायदया साठी स्वीकारली आहे.

अशाप्रकारे नमुद आरोपीतांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरुपयोग केला म्हणुन त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा.

( मंजितसिंग चव्हाण)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे